## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या लोकपालपदी छत्रपती संभाजी नगर येथील महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विलास सपकाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग तसेच भारत सरकार यांच्या असाधारण भाग-३ खंड ४ प्रमाणे प्रकाशित केलेल्या राजपत्रानुसार विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मान्यतेने प्रा. विलास सपकाळ यांची विद्यापीठाच्या लोकपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. रूजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षा करीता किंवा त्यांच्या वयाच्या ७० वर्षापर्यंत यात जे आधी असेल तोपर्यंत त्यांची नियुक्ती राहील. विद्यापीठाशी संलग्नित तीनही जिल्हयातील महाविद्यालये व विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्याची प्रक्रिया लोकपाल यांच्यामार्फत केली जाणार आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. ७ (प्रतिनिधी) राजस्थानच्या जे.जे.टी. विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय तायक्वांदो स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला तीन कास्य पदक प्राप्त झालेत.

जे.जे.टी. विद्यापीठात तायक्वांदो स्पर्धा नुकतीच पार पडली. निलेश पाटील (रसायनशास्त्र प्रशाळा, कबचौ उमवि, जळगाव) याने ६० कि.ग्रॅ. गटात कास्य, महिमा चौधरी (व्ही.एस. नाईक महाविद्यालय, रावेर) हिने ४९ कि.ग्रॅ. गटात आणि प्रेरणा जगताप (सदगुरू शिक्षण संस्थेचे शारीरिक शिक्षण शास्त्र महाविद्यालय, जळगाव) हिने ७३ कि.ग्रॅ. गटात कास्य पदक प्राप्त केले. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील, प्रशिक्षक प्रा. उमेश पाटील, प्रा. किशोर पवार, अमर हटकर उपस्थित होते.

**बातमी नं. ३**

जळगाव दि. ७ (प्रतिनिधी) उद्योग आणि विद्यापीठ आंतर संवाद उपक्रमांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र प्रशाळेत आठ उद्योग समुहांच्या अधिकाऱ्यांनी सहभागी होत विद्यार्थ्यांना इंटर्नशिप उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

विद्यापीठाच्या भौतिक शास्त्र प्रशाळेत या आंतरसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी बोलतांना प्रा. माहेश्वरी यांनी विद्यापीठात प्रारंभापासून पारंपारिक अभ्यासक्रम सुरु न करता रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरु करण्यात आल्याची आठवण देत विद्यापीठ आणि समाज व उद्योग यांच्या संवाद ठेवण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना इंटर्नशिप बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे उद्योग समुहांनी विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून द्यावी असे आवाहन प्रा. माहेश्वरी यांनी केले. मास टेक कंट्रोल प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक सुभाष पाटील यांनी यावेळी बोलतांना विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचे शिक्षण घेतल्यानंतर एक ते दोन वर्ष इंडस्ट्री मध्ये काम करावे. इंटर्नशिपसाठी विद्यार्थ्यांचा अवश्य विचार केला जाईल असे ते म्हणाले. सातपुडा ॲटोचे संचालक किरण बच्छाव यांनी ऑटोमोबाईल उद्योगात दर तीन

वर्षांनी नवनवीन बदल घडत आहेत. मोठी आव्हाने उभी आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी तयार रहावे असे सांगून विद्यार्थ्यांना इंटर्नशिप देण्याचे आश्वासन दिले.

प्रारंभी संचालक प्रा. जयदीप साळी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जसपाल बंगे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. डी.जी. शिरोळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास स्पेक्ट्रम इलेक्ट्रीकल इंडस्ट्रीज जळगावचे चेतन चावरीया, नरेंद्र वाघ तसेच मास टेक कंट्रोलचे डी.ओ. चौधरी, एस.एन. पाटील, सुधीर चौधरी, जैन इरिगेशनचे संजय फडणीस, माऊली सोलार, जळगावचे सतिष पाटील व हितेंद्र पाटील, सुदर्शनचे सोलारचे चंद्रशेखर महाजन व सचिन सोनवणे, सातपुडाचे कुणाल मराठे आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

…………………………………………………………………………………………………………………..

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ७ फेब्रुवारी, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी